महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २२९ वा | दिनांक : ०६/०७/२०२५ | वार : रविवार

# ठाकरे बंधूंचा विजयी मेळावा, मराठी भाषेच्या लढ्याला




**मुंबई :** राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषा शिकवण्याचा घेतलेला निर्णय अखेर मागे घेतला असून, यानंतर ठाकरे बंधूंनी आयोजित केलेल्या विजयी मेळाव्याला राज्यभरातून प्रतिसाद मिळाला. मराठी भाषेच्या सन्मानासाठी उभारलेल्या लढ्याला मिळालेलं हे यश म्हणजे मराठी अस्मितेच्या संघटीत शक्तीचं प्रतीक असल्याचे राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे. यामुळे आता आगामी निवडणुकीत नवी राजकीय समीकरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

या मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे दोघेही पहिल्यांदाच एका मंचावर एकत्र आले. "मोर्चा निघाला असता, तर मराठी माणसाची एकजूट संपूर्ण महाराष्ट्राने पाहिली असती. मात्र, फक्त चर्चा झाल्यावरच सरकारने पावले मागे घेतली," असे राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात सांगितले. यावर उद्धव ठाकरे यांनीही सरकारच्या भूमिकेवर कठोर शब्दांत टीका केली.

या विजयी मेळाव्याला राज्यातील विविध राजकीय पक्षांचे नेतेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे, रासपचे महादेव जानकर, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड, रिपब्लिकन पार्टीचे सचिन खरात, शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील, प्रकाश रेड्डी यांच्यासह अनेक नेते व्यासपीठावर उपस्थित होते. या एकत्रित उपस्थितीमुळे राज्याच्या राजकारणात नवा बदल घडण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

राज ठाकरे म्हणाले की, मी एक पत्र लिहिले, दुसरे लिहिले मग दादा भुसे माझ्याकडे आले.मला म्हणाले की आम्ही काय म्हणतो समजून घ्या. ऐकूण घ्या. म्हटले दादा तुम्हाला एक सांगतो तुम्ही काय सांगता ते ऐकूण घेईल पण ऐकणार नाही. त्रिभाषा सूत्र हे केवळ केंद्र सरकार आणि राज्य सरकारमधील दुवा म्हणून आणण्यात आले. आज सुप्रीम कोर्ट, हायकोर्टात इंग्रजी आहे तिथे हे सूत्र नाही. केंद्रीय शैक्षणिक धोरणातही हे सूत्र नाही.इतर कोणत्या राज्यात ही नाही. महाराष्ट्रात प्रयोग करुण पाहिला. दक्षिणेतील राज्य तर यांना विचारतही नाही. पण महाराष्ट्र पेटून उठला की काय होते हे सत्ताधाऱ्यांना दिसले असेल. त्याशिवाय का माघार घेतली.

बऱ्याच दिवसानंतर राज आणि माझी भेट व्यासपीठावर झाली. त्याने माझा उल्लेख सन्मानीय असा केला. त्याचेही कर्तुत्व आपण सर्वांनी पाहिले आहे. त्यामुळे मी देखील सन्मानीय राज ठाकरे यांचा असा उल्लेख करतो. आज आम्ही एकत्र आलो हे जास्त महत्त्वाचे असल्याचे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. सरकार येते, सरकार जाते. मात्र, आपली ताकद एकजुटी मध्ये असायला हवी. सरकार येईपर्यंत मराठी माणूस एकत्र येतो. आणि सरकार आले की, एकमेकांचे पाय खेचतो, अशी खंत देखील उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली. मराठी माणूस मराठी माणसाची भांडला आणि दिल्लीचे गुलाम आपल्या डोक्यावर बसले असल्याचेही उद्धव यांनी म्हटले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबाची मदत १ लाखापेक्षा वाढवण्यास स्पष्ट नकार



**मुंबई :** महसूल व वन विभाग नापिकी, राष्ट्रीयीकृत बँक व सहकारी बँक किंवा मान्यताप्राप्त सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करू न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे शेतकऱ्याने आत्महत्या केल्यास त्याच्या वारसांना नियमानुसार एक लाख रुपये इतकी मदत देण्यात येते. मात्र, वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत व्यक्तींच्या वारसांना मिळणाऱ्या मदतीच्या धर्तीवर शेतकरी आत्महत्या प्रकरणांतील कुटुंबीयांना वाढीव मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही, अशी माहिती मदत आणि पुनर्वसन विभागाचे मंत्री मकरंद जाधव (पाटील) यांनी विधानसभेत एका तारांकित प्रश्नाच्या लेखी उत्तरात दिली आहे.

महाराष्ट्रात वाघाच्या हल्ल्यात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास राज्य सरकार २५ लाख रुपयांची मदत देते. म्हणूनच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत वाढवण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे. परंतु विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या उत्तरात मंत्र्यांनी लेखी उत्तर दिले आहे की असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही. आमदार रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आदींनी हा प्रश्न विचारला होता.

अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या मागणीसाठी प्रहार जनशक्ती पक्षाने शुक्रवारी विधानभवन परिसरात जोरदार आंदोलन केले. राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा मुद्दा गंभीर बनला असून, सरकारने तातडीने सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, अशी मागणी यावेळी प्रहारच्या कार्यकर्त्यांनी केली. कार्यकर्त्यांनी विधानभवन परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेच्या गेटवर चढून आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करा, शेतकरी विरोधी सरकार हाय हाय अशा घोषणा देत आंदोलकांनी विधानभवन परिसर दणाणून सोडला. या आंदोलनामुळे विधानभवन परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र आंदोलकांना ताब्यात घेत पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

सरकारच्या १०० दिवसांच्या कामकाजाच्या मूल्यांकनात कृषी विभागाला केवळ ३५ आणि शिक्षण विभागाला ११ टक्के गुण मिळाले. दानवे यांनी यावरून सरकारची कार्यक्षमता आणि शेतकरी-दृष्टिकोनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. बैल नसल्याने शेतकऱ्याला करावी लागलेली नांगरणी या शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेकडे दानवे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. ते म्हणाले, केंद्राने बड्या उद्योगपतींचे ९.२६ लाख कोटी रुपये माफ केले, पण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर ८.३२ लाख कोटींचं कर्ज आहे.

शेतकरी प्रश्नांवर सरकार संवेदनशील नाही, फक्त जाहिराती करते असा घणाघात विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारवर केला. पीक विमा थकबाकी, बोगस बी-बियाणे, हमीभावाचा अभाव, युरिया भेसळ, कर्जमाफी यांसारख्या मुद्द्यांवर २६० च्या प्रस्तावाअन्वये दानवे यांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेतली. दानवे म्हणाले की, महायुती सरकार सत्तेत आल्यापासून गेल्या तीन वर्षांत तब्बल २ हजार ८६६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून अमरावती आणि मराठवाडा विभाग हे सर्वाधिक आत्महत्याग्रस्त भाग आहेत.

पूर्वी वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास ५ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जात होती, पुढे ही रक्कम १० लाख रुपये आणि ही रक्कम नंतर वाढवून १५ लाख रुपये करण्यात आली. आता ही रक्कम २५ लाख रुपये आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ जुलै २०२५


## अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स अँड ज्युनिअर कॉलेज येथे आषाढी एकादशीचा उत्सव आनंदात साजरा



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** येथील आसेगाव तळेसमान आषाढी एकादशीनिमित्त, अंजना स्कूल ऑफ एक्सलन्स भक्ती आणि परंपरेच्या उत्साही भावनेने जिवंत झाले. विद्यार्थ्यांनी हा शुभ दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला, भगवान विठ्ठलाच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या उत्सवांमध्ये स्वत:ला विसर्जित केले. पारंपारिक उत्सव विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणांद्वारे त्यांची सर्जनशीलता आणि भक्ती प्रदर्शित केली. त्यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व अधोरेखित करणारे मनमोहक नृत्य सादरीकरण आणि आकर्षक स्किट्स सादर केले. विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे गायले असता "विठ्ठल, विठ्ठल" या मधुर जपाने वातावरण भरून गेले होते, ज्यामुळे एकता आणि भक्तीची भावना निर्माण झाली. विशेष उल्लेख ह भ. प. बालकृष्ण इलक महाराज यांच्या सहभागाने उत्सवाच्या भावनेत भर पडली आणि यावेळी त्यांचे अभंग आणि दिंडीचे सादरीकरण जरी वगळण्यात आले असले तरी, ते नेहमीच विद्यार्थ्यांकडून उत्सुकतेने वाट पाहत असतात. विद्यार्थ्यांचे सादरीकरण त्यांच्या प्रतिभेचे आणि पारंपारिक पद्धती जपण्याच्या समर्पणाचे प्रतिबिंब होते. शालेय भावना अंजना स्कूल ऑफ एक्सलन्समधील उत्सव हा शाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक जागरूकता आणि आध्यात्मिक विकास वाढवण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब होते. विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांमुळे आणि शाळा प्रशासनाच्या मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला. समाप्ती अंजना स्कूल ऑफ एक्सलन्समध्ये आषाढी एकादशीचा उत्सव सहभागी असलेल्या प्रत्येकासाठी एक संस्मरणीय अनुभव होता. विद्यार्थ्यांची प्रतिभा आणि सांस्कृतिक वारशाप्रती शाळेची समर्पण दाखवणारा तो दिवस भक्ती, सर्जनशीलता आणि आनंदाने भरलेला होता.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री शंकरजी पल्हाळ व श्रीमती स्मिता पल्हाळ यांनी भूषवले व्यासपीठावर श्री स्वर्णजीतजी पाल्हाळ, श्रीमती मोनिका पाल्हाळ, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्नेहा पवार व श्री देव साठे सर यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसंत देशमुख सर व कार्यक्रमाचे आभार पल्लवी खाटीक मॅम यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## मनपा केंद्रीय प्राथमिक शाळेत आषाढी एकादशीनिमित्त एक भक्तिमय आणि सांस्कृतिक कार्यक्रम साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी येथे आषाढी एकादशीनिमित्त एक भक्तिमय आणि सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्यात आला. या पावन प्रसंगी शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून विठ्ठल-रुक्मिणीच्या भक्तीत मनोभावे सहभागी होत वारकरी सांप्रदायाची शान उंचावली.कार्यक्रमाची सुरुवात 'ज्ञानोबा-तुकाराम' या जयघोषाने व भजनाने झाली. विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात पालखी मिरवणुकीचे सादरीकरण केले. पारंपरिक अभंग, फुगड्या, गाणी आणि नृत्य सादर करून त्यांनी उपस्थितांचे मन जिंकले.मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये भक्तिभाव, संस्कृतीची जाणीव व सामूहिक सहभागाची भावना निर्माण केली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आषाढीनिमित्त दिंडीचे आयोजन



मनपा प्राथमिक व माध्यमिक विदयालय चिकलठाणा शाळेत दि. ५/७/२०२५ रोजी आषाढीनिमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले. बालवर्ग व १ली ते १०वी सर्व विद्यार्थांनी सहभाग घेतला. मु.अ. व सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ जुलै २०२५


## एकाच्या भाषणात सत्तेची, स्वार्थाची मळमळ दिसली - एकनाथ शिंदे



**मुंबई** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्यावर प्रतिक्रिया देताना या सोहळ्यावर टीकास्त्र सोडले. राज ठाकरे यांच्या भाषणातून मराठी भाषेबाबतची तळमळ दिसली, पण उद्धव ठाकरे यांच्या भाषणात मात्र केवळ सत्ता, खुर्ची आणि स्वार्थाची मळमळ होती, अशी टीका एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केली. तसेच या मेळाव्यातून मराठी माणसाचा अपेक्षाभंग झाला असल्याचे ते म्हणाले.

उद्धव ठाकरे यांनी आजच्या मराठी विजयी मेळाव्यात भाषण करताना पुष्पा स्टाईलमध्ये उठेगा नहीं साला म्हणज एकनाथ शिंदेवर टीका केली. या टीकेला प्रत्युत्तर देताना, अब उठेगा नहीं साला, हा डायलॉग उद्धव ठाकरेंना शोभून दिसतो, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला. तीन वर्षांपूर्वी दाढीवरून अर्धाच हात फिरवल्याने ते आडवे झाले, अजूनही सावरले नाहीत. आता कुणाचा तरी हात पकडून उठण्याचा प्रयत्न करत आहेत. पूर्ण दाढीवरून हात फिरवला असता, तर काय झाले असते, याचा विचार त्यांनी करावा, अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. फक्त तोंडाच्या वाफा सोडून होत नाही, त्यासाठी मनगटात जोर लागतो, असेही शिंदे म्हणाले.

एकाने मराठीबद्दल असलेली तळमळ बोलून दाखवली. दुसऱ्याने सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी असलेली मळमळ बोलून दाखवली. झेंडा नाही, अजेंडा नाही असे काही लोक म्हणत होते. पण एका वक्त्याने ते पथ्य पाळले, मात्र दुसऱ्याने स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडा रंग शारदेच्या भाषणात निवडणुकीच्या भाषणाप्रमाणे बोलून दाखवला, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

मराठीबाबत बोलायचे झाले, तर त्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्यगीत म्हटले, यासाठी त्यांचे अभिनंदन. पण महाराष्ट्राच्या राज्यगीताला मी मुख्यमंत्री असताना मान्यता दिली आणि ते राज्यगीत सुरू केले. मी मुख्यमंत्री असताना, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आमच्या टीमने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला. त्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी होकार देत तत्काळ मान्यता दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणाऱ्या मोदींनाही त्यांनी सोडले नाही. हे दुर्दैवी आहे. यातून त्यांची वृत्ती, त्यांची पोटदुखी दिसून आली. त्यांची लाचारी दिसून आली, असा टोला एकनाथ शिंदेंनी लगावला.

राज ठाकरे यांच्या भाषणात मराठी माणसासाठी असलेली तळमळ दिसली. तर उद्धव ठाकरे यांच्या भाषणात सत्ता आणि खुर्चीसाठीची मळमळ दिसली, अशी टीका शिंदे यांनी केली. उद्धव ठाकरे माझ्यावर सातत्याने टीका करत असतात. पण मी त्यांच्या टीकेला उत्तर देत नाही. मी कामातून उत्तर दिले. त्यामुळेच मी मुख्यमंत्री झालो. अडीच वर्षांनी झालेल्या निवडणुकीतही आमचा मोठा विजय झाला, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

मराठी माणूस मुंबईच्या बाहेर का फेकला गेला? मराठी टक्का कमी का होत गेला? वसई, विरार, नालासोपारा, बदलापूर, अंबरनाथपर्यंत मराठी माणूस का गेला? याचे उत्तर उद्धव ठाकरेंनी द्यावे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

ठाकरे बंधू एकत्र येण्याबाबत प्रश्न विचारल्यावर लोकशाहीमध्ये कोणालाही कोणासोबतही युती आणि आघाडी करण्याचा अधिकार आहे. निवडणुका जशा जवळ येतील, तशा अनेक घटना दिसतील. त्यामुळे मी सर्वांनाच शुभेच्छा दिल्या आहेत, असे एकनाथ शिंदे म्हणाले. राज ठाकरे यांनी मराठीबद्दलची तळमळ बोलून दाखवली. उद्धव ठाकरे यांनी स्वार्थाचा झेंडा आणि सत्तेचा अजेंडा बोलून दाखवला. त्यामुळे पोटातील ओठावर आले. मराठी माणसांचा अपेक्षाभंग झाला आहे, असेही एकनाथ शिंदे म्हणाले.

## तामिळनाडूत ‘एआयएडीएमके’ मोठा भाऊ - पलानीस्वामी



**चेन्नई** : तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री ई पलानीस्वामी यांनी शनिवारी स्पष्ट केले की, राज्यात भाजपसोबतच्या युतीमध्ये अखिल भारतीय अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम (एआयएडीएमके) हा मोठा भाऊ आहे. ते म्हणाले की, कोणताही पक्ष, कितीही मोठा असला तरी, आपल्यावर वर्चस्व गाजवू शकत नाही.

पलानीस्वामी म्हणाले की, तामिळनाडूमध्ये एआयएडीएमके गेल्या ३० वर्षांहून अधिक काळ सत्तेत आहे. जर २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत युती जिंकली तर राज्यात युती सरकार राहणार नाही. हा करार फक्त निवडणुकांसाठी आहे.

पलानीस्वामी म्हणाले की, पक्ष ७ जुलै रोजी कोइम्बतूर येथून निवडणूक प्रचाराला सुरुवात करेल. भाजपचे नाव न घेता त्यांनी सांगितले की, सर्व आघाडीतील भागीदारांना आमंत्रित करण्यात आले आहे. अभिनेता विजय यांच्या तमिलगा वेत्री कझगम (टीव्हीके) पक्षासाठी दरवाजे खुले आहेत.

तथापि, टीव्हीकेने ४ जुलै रोजी विजय यांना पक्षाचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार म्हणून घोषित करण्याचा ठराव मंजूर केला. यावेळी विजय यांनी सांगितले होते की, तामिळनाडु निवडणुकीत पक्ष द्रमुक किंवा भाजपशी कोणत्याही प्रकारची युती करणार नाही.

गृहमंत्री अमित शहा यांनी ११ एप्रिल रोजी चेन्नईमध्ये भाजप आणि अण्णाद्रमुक युतीची घोषणा केली होती. त्यांनी सांगितले होते की २०२६ मध्ये होणाऱ्या तामिळनाडू विधानसभा निवडणुका अण्णाद्रमुकचे प्रमुख ई पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली लढवल्या जातील. जागावाटप नंतर होईल.

शहा म्हणाले होते की, अण्णाद्रमुकची युतीबाबत कोणतीही मागणी नाही आणि भाजप त्यांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही. पक्षाचे एनडीएमध्ये सामील होणे दोघांसाठीही फायदेशीर आहे.

शहा म्हणाले की, पुढील निवडणूक द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) सरकारच्या भ्रष्टाचाराच्या, दलितांवरील आणि महिलांवरील अत्याचारांच्या आधारे लढवली जाईल. घोटाळ्यांबद्दल लोक द्रमुककडून उत्तरे मागत आहेत, निवडणुकीत लोक या मुद्द्यांवर मतदान करतील.

दोन्ही पक्ष सप्टेंबर २०२३ पर्यंत युतीत होते, परंतु तत्कालीन तामिळनाडू भाजप अध्यक्ष अन्नामलाई यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे अण्णाद्रमुकने युती तोडली.

## मेहुण्याच्या लग्नासाठी पत्नी-सासूला नग्न विधी करायला लावले



**ठाणे** : मुंबईतील एका व्यक्तीने आपल्या मेहुण्याला लग्नात मदत करण्याच्या उद्देशाने आपल्या पत्नी आणि सासूला काळ्या जादूशी संबंधित काही विधी विवस्त्र होऊन करण्यास भाग पाडले. त्यानंतर आरोपीने त्यांच्या परवानगीशिवाय त्यांचे नग्न फोटो काढले. त्यानंतर त्याने या फोटोंसह तिला अजमेरला बोलावले.

पीडिता जेव्हा अजमेरला फोटो घेऊन गेली तेव्हा आरोपीने ते फोटो महिलेच्या वडिलांना आणि भावाला व्हाट्सॲपवर पाठवले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हा उत्तर प्रदेशातील देवरियाचा रहिवासी आहे.

ही संपूर्ण घटना एप्रिल ते जुलै दरम्यान नवी मुंबईतील आरोपीच्या घरी घडली. पीडितेने 3 जुलै रोजी वाशी पोलिस ठाण्यात धाव घेतली. गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास सुरू करण्यात आला. अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

महाराष्ट्रात अंधश्रद्धा आणि मानवबळी विरोधी कायदा 2013 आहे. या कायद्याचा उद्देश समाजात प्रचलित असलेल्या अंधश्रद्धा, तंत्र-मंत्र, काळी जादू, मानवीबळी आणि अघोरी कुप्रथा थांबवणे आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे आहे.

या कायद्यानुसार, मानवी बलिदानाची योजना आखणे किंवा ते करणे आणि काळी जादू करून, भूतबाधा करून किंवा देव-देवतांच्या नावाखाली घाबरवून एखाद्या व्यक्तीचे शोषण करणे किंवा मानसिक त्रास देणे हा कायदेशीर गुन्हा आहे.

नग्न पूजा करून, शारीरिक छळ करून, राख देऊन किंवा ताबीज देऊन समस्या सोडवण्याचा दावा करणे हा गुन्हा आहे. महिलांचे लैंगिक शोषण करणे किंवा त्यांच्यावर मानसिक दबाव आणून तांत्रिक विधी करणे हे दंडनीय आहे.

भूत, ग्रह, तारे, देव किंवा शापांच्या नावाखाली पीडितेला घाबरवण्यासाठी आणि धर्माच्या नावाखाली फसवणूक किंवा अमानुष वर्तन करण्यासाठी देखील शिक्षा होऊ शकते.


**१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी**

**D.M.L.T**

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०६ जुलै २०२५


## अर्बन नक्षलवादी कोण ?



वारकऱ्यांच्या त्या दिंडीत
संविधानाची एक दिंडी
एक बाई त्यांना म्हणे
हे कोण अर्बन नक्षलवादी ?

संविधानवाले त्या दिंडीत
म्हणे बुद्धीभेद करता
हजारो वर्ष तुम्हीच तर विषमता पेरली
मग खरे नक्षलवादी कोण ?

म्हणे बाई कायद्याच्या अभ्यासक
डोक्याचा काही भाग नाही
ज्या संविधानाने तुम्हाला अधिकार दिले
त्या कायद्याची थोडीही जाण नाही

अहो,बाई स्त्रियांचा इतिहास जरा आठवा
जाती,धर्माच्या अन् मनूच्या कोंडवाड्यात होता तुम्ही
संविधानानेच तर माणूसपण मिळवून दिले
खरंच तुम्हा स्त्रियांना जाण नाही ?

तुम्हीच तर कायद्याची मोडतोड
समाजाची,देशाची दिशाभूल करता
जगण्याचा अधिकार दिला ज्यानी
त्या संविधानालाही गद्दार,बेईमान होता

अहो, तुम्हाला जनाची नाही
मनाची तर मुळीच नाही
अर्बन नक्षली कुणाला म्हणता
किमान त्या संविधानाची तरी बाळगा

आजही तुमच्या पोटात
जाती-धर्माचं खचाखच विष
सत्याला असत्य म्हणणे
तुमचा खोटारडा धंदा आहे

संविधानाची बाजू घेणारे
अन्याय अत्याचारा विरुद्ध लढणारे
हे तर खरे संविधानाचे व देशाचे सेवक
त्यांना नक्षलवादी ठरवता तुम्ही ?


**प्रा. डॉ. सतीश मस्के,**
**पिंपळनेर, धुळे मो. ९१ ७५०७५ ०४०४६**


## ज्ञाना भेटी निघाले शाळकरी




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुरूम येथील जि प स्पेशल प्रा शाळेच्या विद्यार्थ्यांनी ग्रंथ दिंडी व वृक्ष दिंडी काढली. आषाढी एकादशीला वारकरी पांडुरंगाच्या भेटीला जातात. जगाच्या कल्याणासाठी साकडे घालतात. अगदी तसेच जगाच्या कल्याणासाठी जि प स्पेशल शाळेच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानाशिवाय प्रगती नाही. झाडाशिवाय जीवन नाही असा संदेश देत गाव प्रदिक्षणा केला. हातात पुस्तक घेऊन वाचाल तर वाचाल, डोईवर इवलेसे रोपटे ठेवून एक पेड मॉं के नाम घोषणा दिल्या. हनुमान चौक, विठ्ठल मंदिर, साठे नगर, नगरपरिषद, आंबेडकर शहर वाचनालय समोर रिंगण करून फुगडी खेळले. गौतमी लिमये, विश्ववेध मुरूमकर, गुंजन लिमये, कनिष्का किरात हे विठ्ठल रखुमाई वेशभूषा केले होते. दिक्षांत कांबळे व प्रशांत देडे यांनी ग्रंथ दिंडी वाहिली. अध्यक्ष व शिक्षकांनी फुगडी खेळून विद्यार्थ्यांना प्रेरीत केले.याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निर्मलकुमार लिमये, शिवराज कांबळे, माजी अध्यक्ष आनंदकुमार कांबळे, सदस्य, माता पालक यांची साथ लाभली. टाळ, चिपळी व मृदंगाच्या गजरात दिंडी घेऊन शहर प्रदिक्षणा यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे, सुनिता मिरगाळे, शिवाजी गायकवाड, मंगल कचले व रुपचंद ख्याडे यांनी अथक परिश्रम घेतले.

## संच मान्यतेमुळे जि. प. च्या ८८४ शाळांवर गंडांतर



**मुंबई :** शिक्षण विभागाच्या संच मान्यतेच्या नव्या निकषांमुळे राज्यातील ८८४ अनुदानित माध्यमिक शाळांवर गंडातर आले आहे. यामध्ये कोकणातील ९९ व साताऱ्यातील ५९ शाळांचा समावेश आहे. या गंभीर मुद्द्यावर विधान परिषदेत सर्वपक्षीय आमदारांनी आवाज उठवला. त्यानंतर शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी यातील त्रुटींची कबुली देत, लवकरच सुधारित परिपत्रक जारी करण्यात येणार असल्याचे सभागृहात जाहीर केले.

राज्यात संचमान्यतेनुसार जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षक व मुख्याध्यापकांची पदे निश्चित होतात. त्यानुसार सन २०२४-२५ या वर्षाच्या संच मान्यतेचे निकष शिक्षण विभागाने जाहीर केले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांना फायदा होण्याऐवजी तोटाच सहन करावा लागतो आहे. पुणे विभागातील माध्यमिक शाळेतील अनेक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अद्याप शालार्थ आयडी मिळालेले नाहीत. अनुदानित माध्यमिक शालांपैकी ८८४ शाळांना २०२४-२५ च्या संचमान्यतेमध्ये एकही शिक्षकांचे पद मंजूर करण्यात आलेले नाही. सातारा जिल्ह्यातील ५९ शाळा शून्य पदांच्या दाखविण्यात आल्या असून त्या बंद हेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच कोकण विभागातील ९९ शाळांनाही याचा फटका बसला आहे. शालार्थ आयडी देण्यासाठी उप शिक्षण संचालकांच्या कार्यालयात दीड लाख रुपये घेतले जातात. शिक्षण विभागातील अनेक अधिकारी जेलमध्ये जाऊनसुद्धा हा विभाग दुरुस्त झाला नाही, अशी बाब अभिजीत वंजारी यांनी परिषदेच्या निदर्शनास आणून दिली.

राज्यमंत्री भोयर यांनी वस्तुस्थिती खरी असल्याचे सांगत संचमान्यतेत अनेक त्रुटी असल्याचे मान्य केले. तसेच त्या सुधारण्याच्या दृष्टीने परिपत्रकात सुधारणा करण्याच्या कार्यवाही सुरू आहे. हा राज्यव्यापी प्रश्न असल्याने आपणा सर्वांबरोबर एक बैठक घेऊन त्यात अधिकच्या सुधारणा केल्या जातील. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन भोयर यांनी दिले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस**

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# पुजाऱ्याने मंदिरात दोन मुलींवर केला बलात्कार

**छतरपूर (मध्य प्रदेश)** : मध्यप्रदेशातील छतरपूरमध्ये एका ६० वर्षीय पुजाऱ्यावर मंदिरात दोन मुलींवर बलात्कार केल्याचा आरोप आहे. मुलींचे कुटुंब मंदिरात पोहोचताच पुजाऱ्याने त्यांच्यावर त्रिशूळाने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. लोकांनी त्याला मारहाण केली. शुक्रवारी रात्री उशिरा कुटुंबाने पोलिस स्टेशन गाठले आणि तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी पुजाऱ्याला पॉक्सो अंतर्गत ताब्यात घेतले आहे.

ही घटना गढीमलहरा येथील आहे. अल्पवयीन बहिणींच्या कुटुंबीयांनी पोलिसांना सांगितले की, आरोपी भागवत शरण दुबे हा गावातील महाकाल आश्रम मंदिराचा पुजारी आहे. तो उजरा येथील रहिवासी आहे आणि गेल्या ४ वर्षांपासून आश्रमात राहत आहे. गुरुवारी ५ आणि ६ वर्षांच्या चुलत बहिणी घरी जात होत्या. यादरम्यान, पुजारी दोघांनाही प्रसाद देण्याच्या बहाण्याने मंदिरात घेऊन गेला. मुली घरी आल्या आणि त्यांनी त्यांच्या कुटुंबियांना सांगितले.

पहिल्या वेळी जेव्हा पुजाऱ्याने गुन्हा केला तेव्हा त्याच्या कुटुंबातील सदस्य त्याला समजावण्यासाठी आले. त्यानंतर दुसऱ्यांदा लोकांनी त्याला गावातून हाकलून लावण्याचा निर्णय घेतला. त्याला मंदिर सोडण्यास सांगण्यात आले, पण तो गेला नाही. गुरुवारी, पुजाऱ्याने तिसऱ्यांदा मुलींशी वाईट कृत्य केले. यानंतर, त्याच्याविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

पोलीस स्टेशनच्या प्रभारी रीता सिंह म्हणाल्या की, पुजारी भागवत शरण दुबे यांनी मुलींना प्रसाद देण्याच्या बहाण्याने बोलावले. त्यानंतर त्यांनी त्यांच्यासोबत अश्लील कृत्ये केली. तक्रारीनंतर मुलींना वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. शुक्रवारी रात्री रुग्णालयात एकही महिला डॉक्टर आढळली नाही. मुलींचे एमएलसी आज केले जाईल. आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. मुलींच्या गुप्तांगावर जखमांच्या खुणा आहेत.

# लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष



**पटना** : लालू यादव १३ व्यांदा राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. शनिवारी पाटणा येथील बापू सभागृहात झालेल्या राजदच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. ते २०२८ पर्यंत राजदचे राष्ट्रीय अध्यक्ष राहतील.

राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर लालू यादव आणि राबडी यांनी कार्यकर्त्यांचे आणि पक्षाच्या नेत्यांचे हात हलवून स्वागत केले. अधिवेशनाचे अध्यक्षपद पक्षाचे राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. रामचंद्र पूर्वे यांनी भूषवले.

लालू यादव यांनी २३ जून रोजी पाटणा येथील पक्ष कार्यालयात अध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केला. त्यांच्याविरुद्ध इतर कोणत्याही नेत्याने अर्ज दाखल केला नाही.

यानंतर निवडणूक अधिकारी डॉ. पुर्वे यांनी त्यांना बिनविरोध अध्यक्ष घोषित केले. बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि त्यांचे धाकटे पुत्र तेजस्वी यादव यांच्यासह पक्षाचे सर्व वरिष्ठ नेते, खासदार, आमदार आणि राज्यभरातील कार्यकर्ते या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.

५ जुलै १९९७ रोजी राजदची स्थापना झाली. त्यावेळी लालू प्रसाद यादव जनता दलाचे तत्कालीन अध्यक्ष आणि बिहारचे मुख्यमंत्री होते. नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीला सुरू झालेल्या चारा घोटाळ्याच्या चौकशीची उष्णता लालूंपर्यंत पोहोचली होती.

तपासानंतर सीबीआयने लालू यादव यांच्याविरुद्ध आरोपपत्र तयार केले होते. घोटाळ्याच्या मोठ्या आरोपांदरम्यान, जनता दलाचा एक गट लालूंवर पक्षाध्यक्ष आणि बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यासाठी दबाव आणत होता.

लालूंनी परिस्थितीचे गांभीर्य समजून घाईघाईने त्यांच्या विश्वासूंची बैठक बोलावली. लालूंना पाठिंबा देणारे १७ लोकसभा आणि ८ राज्यसभा सदस्य या बैठकीला उपस्थित होते. जनता दल सोडल्यानंतर नवीन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.


त्यांच्या मित्रपक्षांकडून पाठिंबा मिळाल्यानंतर लालूंनी सहमती दर्शवली. राष्ट्रीय जनता दलाची स्थापना जाहीर करण्यात आली आणि लालूंना राष्ट्रीय अध्यक्ष बनवण्यात आले.

लालूंच्या पक्षाला कंदील निवडणूक चिन्ह मिळाले. ज्यावर लालू यादव यांनी दावा केला की हा कंदील गरिबांच्या झोपडीत प्रकाश आणेल आणि समाजवादाचा नारा देईल.

पक्षाच्या स्थापनेच्या वेळी, लालू प्रसाद यादव, रघुवंश प्रसाद सिंह, कांती सिंह, १७ लोकसभा खासदार आणि ८ राज्यसभा खासदारांच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने समर्थक जमले होते. पक्षाच्या स्थापनेपासून लालू प्रसाद यादव हे त्याचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत.

पक्ष स्थापनेनंतर माध्यमांशी बोलताना लालूप्रसाद म्हणाले होते की 'आमचा पक्ष हा मूळ पक्ष असेल.' नवीन पक्ष स्थापन केल्यानंतर काही दिवसांनी लालूप्रसाद यांनी एक नवीन राजकीय खेळी केली आणि २४ जुलै १९९७ रोजी त्यांच्या पत्नी राबडी देवी यांना बिहारचे मुख्यमंत्री केले. लालूप्रसाद यांनी एकाच वेळी दोन गोष्टी केल्या. त्यांनी स्वतःचा पक्ष स्थापन केला आणि त्यांची सत्ताही वाचवली.

# पुणे अत्याचार प्रकरणात तरुणीचा खोडसाळपणा; मित्राविरुद्ध तक्रार





**पुणे** : कोंढव्यात कुरियर बॉयने एका युवतीवर अत्याचार केल्याचे प्रकरण संबंधित तरुणीचा खोडसाळपणा असल्याचे उघड झाले आहे. शुक्रवारी पोलिसांनी तरुणीच्या मित्राला ताब्यात घेतल्यानंतर या प्रकरणातील सत्य बाहेर आले आहे. पोलिसांची दिशाभूल करणाऱ्या तरुणीवर कारवाई करण्याच्या विचारात पोलिस आहेत.

गृह मंत्रालयाने आणि राज्य महिला आयोगाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तपासाचे आदेश दिले. या दरम्यान तरुणी चौकशीला सहकार्य करत नव्हती. पोलिसांनी मोबाईल लोकेशन्स, सीसी टीव्ही फुटेज तसेच घटनेच्या वेळी कोणते मोबाईल फोन चालू होते, त्याबाबतचे तांत्रिक विश्लेषण केले. या तपासात बाणेरमधील एका आयटी अभियंत्याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केल्यावर या युवतीने कुभांड उघडकीस आले.

हा अभियंता व ती तरुणी एकाच समाजाचे असून वधू वर परिचय संमेलनात उभयतांची वर्षभरापूर्वी ओळख झाली. त्यानंतर, ते नियमित संपर्कात आले. हा अभियंता तिच्या घरी नेहमी येत असे. दोघे एकत्र फिरायलाही जात असत. त्यांचा दररोज परस्परांशी संपर्क होता. घडना घडली त्या दिवशी सायंकाळी त्यांच्यात झालेल्या बोलण्यानुसारच हा अभियंता तरुण तिच्या घरी गेला होता. तेथून तो रात्री साडेआठच्या सुमारास बाहेर पडला. त्यानंतर, दोन तासांनी या युवतीने पोलिसांकडे अत्याचार झाल्याची फिर्याद दिली.दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू असून पीडितेचे मानसोपचार तज्ज्ञाकडून समुपदेशन केले जात असल्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक

या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002